## संत तुकाविप्र रचीत

### आरती बोरबन येथील गणपतीची

आरती धुंडीराजा । लक्ष लावीन तया ॥
सर्वेश सर्वसाक्षी। निजसुख दातया ॥
आरती धुंडीराजा॥१॥
प्रसन्न गजमुखा । होय स्वामी विनायका ॥
कीर्तन रंग देई । जेणे होय हरीकथा ॥
आरती धुंडीराजा ॥२॥
कीर्तन प्रेमरंग । नित्यनेम सत्संग ॥
आनंद वृत्ती सदा । प्रेमे देई अभंग ॥
आरती धुंडीराजा ॥३॥
अभंग एकदंता । सिध्दी बुद्धीचे कांता ॥
प्रमाण आरती हे । होय प्रसन्न आता ॥
आरती धुंडीराजा ॥४॥
स्वामीया भालचंद्रा । तुकाविप्र हाती धरा ॥
गर्जाया नाम हारी । भक्ती भावे उभा करा ॥
आरती धुंडीराजा ॥५॥